महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण इस्लामपूर

ता. वाळवा, जि. सांगली

## “वार्षिक क्रीडा स्पर्धा अहवाल २०२४-२०२५”

---

दि. २३,४, व ६ जानेवारी २०२५ रोजी आपल्या कॉलेजमध्ये शौक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कबड्डी (मुले,मुली), व्हॉलीबॉल(मुले), बॅडमिंटन (मुले,मुली) व बुद्धिबळ (मुले,मुली) व मैदानी स्पर्धा अशा एकूण पाच क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा यामध्ये घेण्यात आल्या. कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा चालू झाल्याचे हे तिसरे वर्ष, स्पर्धा घेण्याचा “उद्देश विद्यार्थ्यांचा खेळातील सहभाग वाढविणे व स्पर्धेच्या माध्यमातून हेंल्थ फिटनेस विषयी जागृती निर्माण करणे होय.” याप्रसंगी स्पर्धेचे वेळापत्रक वाचून दाखवण्यात आले, यातील मैदानी स्पर्धा या राजारामबापू पाटील इन्डोअर ट्रॅंकवर होतील व उर्वरित स्पर्धा आपल्याच कॉलेजमध्ये होतील असे सांगितले.

स्पर्धेचे उद्घाटन कॉलेजचे महात्मा फुले शिक्षण संस्थेचे मॅंनेजिंग कौन्सिल सदस्य श्री. प्रशांत वाजे यांचेहस्ते झाले. याप्रसंगी कॉलेजच प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी.व्ही.गायकवाड, उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील, ज्युनियर विभागाचे उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील, आय. क्यु. एस. सी.समन्वयक डॉ.प्रमोद गंगणमाले, सिनियर कार्यध्यक्ष डॉ. प्रकाश आठवले, ज्युनियर कार्यध्यक्ष्य प्रा.हरिष वसावे, जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे, विद्यार्थी प्रतिनिधी श्री. विवेक पोळ हे उपस्थित होते. डॉ. अमितराज माने यांनी कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात स्पर्धेविषयी माहिती दिली, त्यांनी या स्पर्धेत एकूण नोंदवलेल्या सांघिक व वैयक्तिक खेळाडूंची संख्या सांगितली. मुलांच्या कबड्डीमध्ये एकूण १४ संघांनी तर मुलींच्यात एकूण ५ संघांनी सहभाग नोंदवला आहे. मुलांच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला आहे. तर मुले आणि मुली यांनी बुद्दीबळ मध्ये एकूण ३२ खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे, बॅंडमिंटन स्पर्धेत एकूण ४७ विद्यार्थांनी सहभाग घेतला, तर प्रथमच यावर्षी सुरु करण्यात आलेल्या मैदानी स्पर्धेस एकूण ११२विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे अशी माहिती आपल्या प्रास्ताविकामध्ये दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटक महात्मा फुले शिक्षण संस्थेचे मॅंनेजिंग कौन्सिल सदस्य श्री. प्रशांत वाजे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदशन करताना सांगितले की आपल्या सारखाच

मी ही कॉलेज जीवनात वार्षिक क्रीडा स्पर्धेत भाग घेत असे पुढे यातूनच मला व्यायामाची आवड निर्माण झाली एकदा आपले कॉलेज जीवन निघून गेले की ते पुन्हा येत नाही त्यामुळे आपण आपल्या या कॉलेज जीवनात अभ्यासाबरोबर इतर गोष्टीत भाग घेतला पाहिजे यात मग कला, क्रीडा, एन.सी.सी अथवा एन.एस.एस यात भाग घेणे आवश्यक आहे असे सांगितले. एन.एस.एस सारख्या बाबीतून आपल्याला सामाजिक कार्याची आवड निर्माण होते तर क्रीडा हे क्षेत्र तुमचा सर्वांगीण विकास करते. आज तरुणांचे मैदानावरील कमी झालेले प्रमाण दवाखान्यांची संख्या मात्र वाढवत आहेत याकडे विद्यार्थ्यांनी गांभीर्याने बघणे आवशयक आहे असे सांगितले, त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व अजून विद्यार्थ्यांची खेळातली संख्या सहभाग वाढला पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी मनोगतात सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या त्याचबरोबर खेळामुळे होणारे फायदे व मिळणाऱ्या संधी याविषयी सांगितले. आपल्या कॉलेजला खेळाची चांगली परंपरा आहे त्या अनुषंगाने विविध शालेय व विद्यापीठ स्पर्धेत आपण सहभागी होऊन प्राविण्य मिळवावे व कॉलेजचे नाव उंचवावे असे सांगितले. या उद्घाटन प्रसंगी आयपील धर्तीवर सर्व सांघिक संघाच्या कर्णधाराना आपल्या संघाची व आपली ओळख सर्वांना करून देण्यासाठी बोलावले गेले. उपस्थित सर्व मान्यवरांनी ही सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप पाटील यांनी मानले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. के. आर. ठाकरे यांनी केले. या प्रसंगी प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२४-२०२५

## -: संघसंख्या व खेळाडू संख्या :-

| अ. क्र | खेळ | खेळाडूंची संख्या |
|---|---|---|
| १ | कबड्डी (मुले) | १२ संघ =११३ |
| २ | कबड्डी (मुली ) | ०२ संघ =३६ |
| ३ | व्हॉलीबॉल (मुले ) | ५ संघ =५२ |
| ४ | बॅंडमिंटन (मुले) | २४ |
| ५ | बॅंडमिंटन ( मुली) | १२ |
| ६ | बुद्धिबळ(मुले व मुली) | १५ |
| ७ | मैदानी स्पर्धा(मुले व मुली) | ४७ |
| **एकूण सहभागी विद्यार्थी =** | | **२९९** |


G-27
महात्मा फुले शिक्षण संस्थेचे
कर्मवीर कॉलेज
सांगली.
वार्षिक
स्पर्धा
















कीडा स्पर्धा

